माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : ४७८/२०२४

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	**प्रथम अपिलीय अधिकारी**
श्री. चिन्मय सेवकराम रामटेककर, सिव्हील लाईन्स, सति बोरी चौक, गोंदिया, ता.जि. गोंदिया	मुख्यालय सहायक, उपअधिक्षक भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया	उपअधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया

सुनावणी दिनांक :- ०९.०४.२०२६

१. उपस्थिती —

अपिलार्थी	विद्यमान जन माहिती अधिकारी	तत्कालीन जन माहिती अधिकारी	विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी	तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी
उपस्थित	**उपस्थित**	**उपस्थित**	**उपस्थित**	**अनुपस्थित**

२. व्दितीय अपील अर्ज —

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०८.०२.२०२४
(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.०२.२०२४
(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे.
(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

३. माहिती अर्ज —

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४.०९.२०२३
(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०४.०९.२०२३
(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन १९८६ पासून आजपर्यंत.
(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : १. मोजणी मामला क्रमांक ५२५/९३ गोंदिया (बुज) दिनांक २२.०३.९३, गट नं. १४१ व १४२ पैकी झालेल्या मोजणीचे सर्व कागदपत्राची नक्कल देण्यात यावी. २. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नाव.
(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, आपण सादर केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता, आपण मागणी केलेली माहिती बाबत ईकडील कार्यालयाचे दिनांक ०८.०९.२०२३ चे पत्रान्वये संबधित संकलणास मागणी

केलेली माहिती त्यांच्याशी संबंधित असल्याने सदर माहिती मागणी केले असता दिनांक १३.०९.२०२३ चे पत्रानुसार माहितीबाबत अभिलेखागारात उपलब्ध नाही असे पत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे आपणास मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारीचे नाव प्रमोद गो. बोकडे असे आहे, असे अपिलार्थीस कळविले.

४. प्रथम अपील —

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २५.०९.२०२३
(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५.०९.२०२३
(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागितलेली माहिती दिली नसल्यामूळे
(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.१०.२०२३ रोजी सुनावणी घेवून, १. अपील मान्य करण्यात येत आहे. २. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आत विनामुल्य पुरवावी, असे आदेशीत केले.

५. युक्तीवाद/लेखी खुलासा —

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार (आस्था व लेखा), उपअधिक्षक भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया श्रीमती अर्चना नखाते उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया श्री. अजय क्षिरसागर उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम.टी. कटरे उपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमुद केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी सादर केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांनी मागणी केलेली माहिती बाबत उपअधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया कार्यालयाचे दिनांक ०८.०९.२०२३ रोजीचे पत्रान्वये संबधित संकलणास मागणी केलेली माहिती अपिलार्थीशी संबंधित असल्याने सदर माहिती मागणी केले असता दिनांक १३.०९.२०२३ रोजीचे पत्रानुसार माहितीबाबत अभिलेखागारात उपलब्ध नाही असे पत्र प्राप्त झाले होते. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारीचे नाव प्रमोद गो. बोकडे असे आहे, असे अपिलार्थीस कळविले. तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.१०.२०२३ रोजी सुनावणी घेवून, अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येत असून, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आत विनामुल्य पुरवावी, असे आदेश पारित केले.

३. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती दिलेली नाही. त्यामुळे संपूर्ण माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

६. निष्कर्ष — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. चिन्मय सेवकराम रामटेककर यांनी दिनांक ०४.०९.२०२३ रोजी मुख्यालय सहायक, उपअधिक्षक भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०९.२०२३ रोजी पत्र पाठवून प्रतिसाद दिला होता. परंतु या प्रतिसादाने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी श्री. चिन्मय

सेवकराम रामटेककर यांनी दिनांक २५.०९.२०२३ रोजी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला होता. त्यांच्या या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.१०.२०२३ सुनावणी घेवून, अपिलार्थी यांना १५ दिवसाचे आत विनामुल्य माहिती पुरविण्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले होते. या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा रेकॉर्डवर शोध घेतला असता, माहिती आढळून आली नसल्यामुळे अपिलार्थी यांना माहिती पुरविता आली नाही, असा युक्तीवाद विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आज दिनांक ०९.०४.२०२६ रोजी आयोगापुढे झालेल्या सुनावणीच्या वेळी केला.

तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जात सन १९८६ पासून ची माहिती मागितलेली आहे, ती माहिती भंडारा जिल्ह्याची होती. परंतु भंडारा जिल्ह्याचे विभागजन झाल्याने गोंदिया जिल्हा अस्तित्वात आला. त्यामुळे संबंधीत माहिती गोंदिया जिल्ह्याकडे हस्तांतरीत करण्यात आली व भंडारा जिल्हाचा रेकॉर्ड भंडारा येथे ठेवण्यात आला. शिवाय मागितलेल्या माहितीच्या संबधीत त्याचा जतन कालावधी केवळ १२ वर्ष ऐवढाच होता. त्यामुळे मागितलेली माहिती पुरविता येणे शक्य नसल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आज दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

असे असले तरी विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी भूमी अभिलेख, भंडारा, ता.जि. भंडारा कार्यालयाला पत्र लिहावे आणि अपिलार्थी श्री. चिन्मय सेवकराम रामटेककर यांनी जी माहिती मागितलेली आहे ती प्राप्त होते का याचा प्रयत्न करण्यात यावा. जन माहिती उपलब्ध होऊ शकली तर अपिलार्थी यांना तत्काळ विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. जर माहिती उपलब्ध होत नसेल तर माहिती अधिकार अधिनियमाचा लोगो वापरून अपिलार्थी श्री. चिन्मय सेवकराम रामटेककर यांना उपलब्ध नसल्याचे स्पष्टपणे कळवावे. या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ०९.०४.२०२६

जावक क्रमांक 4263 दिनांक 19 JUN 2026